**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**एमएमटीसी हाऊस, ५ वा मजला**
**प्लॉट नं. सी २२, ब्लॉक - ई ,**
**वांद्रे कुर्ला संकुल,**
**वांद्रे (पुर्व),मुंबई ४०० ०५१.**

**संकेतस्थळ**- www.mahabocw.in
**दुरध्वनी व फॅक्सक्र.** ०२२-२६५७२६३१
**ई-मेल**- bocwwboardmaha@gmail.com

जा.क्र./ २४११अ /२०२३/संप्रणा-२०२३/प्र.क्र.१/योजना-०२ दिनांक 01 JAN 2024

**प्रति,**

१. **अपर कामगार आयुक्त**
कोकण विभाग/पुणे/नागपूर

२. **कामगार उप आयुक्त/**
नाशिक/ औरंगाबाद / अमरावती

**विषय :**- एकात्मिक कल्याणकारी मंडळ संगणकीय प्रणाली (IWBMS) वर प्राप्त होणाऱ्या बांधकाम कामगारांच्या नोंदणी/नुतणीकरण/लाभ वाटप अर्जावर करावयाच्या कार्यवाहीबाबत.

**संदर्भ :**- १. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचे पत्र क्र. इबांका-११२२३/प्र.क्र. १८९/कामगार-७ दि.०९.११.२०२३

२. मंडळाचे पत्र क्र.मइवइबांकाकम/उपस्थिती/प्र.क्र.३८ /३५७४/२०२२-२०२३/योजना-२ दि.१६ मार्च, २०२३

३. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचे पत्र क्र. इबांका-०४२३/प्र.क्र.५८/कामगार-७ दि.१२ सप्टेंबर, २०२३

४. मंडळाचे पत्र क्र. जा.क्र.१८८५/२०२३/संप्रणा-२०२३/प्र.क्र.१/योजना-२ दि.२०.१०.२०२३

५ मंडळाचे पत्र क्र. जा.क्र.२११४/२०२३/संप्रणा-२०२३/प्र.क्र.१/योजना-२ दि.२२.११.२०२३

६. मंडळाचे पत्र क्र. जा.क्र. २२२२/२०२३ /संप्रणा-२०२३/प्र.क्र. १/योजना-२ दि.७.१२.२०२३

संदर्भिय क्र.४ च्या पत्रान्वये एकात्मिक प्राप्त होणाऱ्या बांधकाम कामगारांच्या नोंदणी/नुतणीकरण/लाभ वाटप अर्जावर करावयाच्या कार्यवाहीबाबतच्या सर्वंकष सुचना निर्गमित करण्यात आल्या होत्या तद्नंतर संदर्भिय ६ च्या पत्रान्वये संबंधित जिल्हा सुविधा केंद्र प्रमुखानी कार्यालयीन कामकाजात अडथळा येवू नये याकरीता आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देखिल निर्गमित करण्यात आलेल्या आहे. शैक्षणिक सहाय्य योजनेचे

अर्ज तपासताना लाभार्थ्यांच्या पाल्यांचे शाळेचे / महाविद्यालयाचे मुळ ओळखपत्र सादर करणे शक्य होत नाही. त्यामुळे शैक्षणिक अर्थ सहाय्याचे अर्ज तपासताना ओळखपत्राबाबतची अट शिथिल करण्यात येत आहे. केवळ ओळखपत्र सादर केले नाही म्हणून अर्ज नाकारण्यात येवू नयेत. मूळ ओळखपत्राची अट वगळून इतर निकषांच्या आधारे शैक्षणिक सहाय्याचे अर्ज तपासून त्यावर कार्यवाही करण्यात यावी.

तसेच काही क्षेत्रीय कार्यालयातील नोंदणी अधिकाऱ्यांमार्फत नजर चुकीने लाभाचा अर्ज नामंजूर करण्यात आला असून सदर अर्ज संगणक प्रणालीतून पुन्हा अर्ज तपासण्याच्या यादीत अंतर्भुत करण्यात यावा अशी विनंती प्राप्त होत आहे. तरी संगणक प्रणालीत सद्यस्थितीत सुधारणा करण्यात आलेली नामंजूर करण्यात आलेले अर्ज पुन्हा संगणक प्रणालीतील तपासणी यादीत अंतर्भुत होणार नाही याबाबत आपल्या स्तरावरुन सर्व नोंदणी अधिकाऱ्यांना सुचित करण्यात यावे व लाभाचे अर्ज तपासताना दक्षता घेण्याबाबतही निर्देशित करण्यात यावे.

०९/०९/२०२४

(विवेक कुंभार)
सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**प्रत :-**

१. मा. मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई
२. मा. प्रधान सचिव (कामगार), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
३. मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई